महाराष्ट्र न्यायिक अकादमी व
भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था
उत्तन—गोराई रोड, उत्तन, भाईंदर (प.), जि. ठाणे — ४०१ १०६

अतुल एम. कुऱ्हेकर
सहसंचालक

दुरध्वनी क्रमांक : ८४३३९९०१०१
ई—मेल : mjauttsc@aij.gov.in

जा.क्र.मन्याअ/उत्तन/1222/२०२५ दिनांक : ०२/०८/२०२५

## दरपत्रक निवेदन

अकादमीतर्फे करण्यात येणारी कामे जसे की, स्थापत्य, विद्युत, फर्निचर, अंतर्गत सजावट, वास्तुशास्त्रज्ञ व इतर या कामांवर देखरेख ठेवणे. गुणवत्ता पडताळणी याबाबतच्या सूचना, इत्यादी कामे करण्यासाठी सल्लागार/तज्ञांची निवडसूची तयार कण्याकरीता निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक सल्लगार/तज्ञ व्यक्तींनी आपली अर्ज कागदपत्रासह बंद पाकीटातून उपसंचालकांच्या कार्यालयामध्ये दि. ०७.०८.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

**अटी व शर्ती :—**

१. संबंधीत कंत्राटदार यांनी स्वत:च्या लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर 'अकादमीतील कामांवर सल्लागार/तज्ञ नेमणुक दरपत्रक' असे नमूद करावे. सदरचे दरपत्रक 'महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन—गोराई रोड, उत्तन, भाईदर पश्चिम—४०११०६' या पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्षात येउन कार्यालयामध्ये दि. ०७.०८.२०२५ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाही.

२. वरिल कामे प्रत्यक्ष केल्याचा व देखरेख करण्याचा अनुभव कमीत कमी दहा वर्ष असणे आवश्यक आहे.

३. सल्लागार/तज्ञ व्यक्तींना कामाचा अनुभव तसेच वरील उल्लेखित कामाचा अनुभव असल्याबाबतचे कागदपत्रे सर्व बायोडाटासह अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४. शासकीय/निमशासकीय कार्यालय किंवा इतर महत्वाच्या ठिकाणी काम केल्याबाबतचे आवश्यक ते कागदपत्रे अर्जासोबत सादर करावे. शासकीय कार्यालय येथे वरील कामाचा अनुभव असणा—यास प्राधान्य दिले जाईल.

५. अर्ज स्विकारणे किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार कार्यालयीन प्रमूखास राहिल.

६. सल्लागार/तज्ञ व्यक्तींना एका वर्षात जास्तीत जास्त १५ भेटी करिता प्रत्येकी १० हजार रूपये मानधन व ३० भेटींकरिता प्रत्येकी ७०००/— रूपये मानधन देण्यात येईल.

७. अकादमीतील कामांची पाहणी सकाळी ९.३० ते दुपारी ४.३० या दरम्यान करता येईल. (गुरूवार साप्ताहिक सुट्टीचा दिवस सोडून.)

**दिनांक : ०२/०८/२०२५**

atul Kurhekar

(अतुल एम. कुऱ्हेकर)
सहसंचालक

महाराष्ट्र न्यायिक अकादमी व
भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था